**नियमित दिवाणी दावा क्र. ८३/२०२५.**

सिंधुताई भ्र वसंतराव जगताप व इतर –वि.– मिनाक्षी भ्र विठ्ठल जगताप व अन्य

CNR No.- MHST070004382025.

## निशाणी क्र.४८ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादींनी प्रतिवादीं विरूध्द, दिवाणी प्रक्रिया संहिता–१९०८, आदेश–३९, नियम–१ व २ अन्वये तात्पुरता मनाई हुकूम मिळणेकरीता दाखल केला आहे.

**वादींचे कथन :–**

०२. प्रस्तुत प्रकरणी न्यायालयाने नि.क्र.०५ वरील तुर्तातुर्त ताकीद अर्जावर प्रतिवादींविरुध्द दावा मिळकतीमध्ये कोणतेही तबदीलीचे व्यवहार करु नयेत, तसेच, दावामिळकतीवर हक्क निर्माण करु नयेत असा आदेश पारित केला आहे. प्रतिवादी क्र.१ ते ३ हे सदर आदेशाची पायमल्ली करीत असून एकत्रीत वहिवाटीस असलेल्या जमिनीमधील ऊसाचे पिक तोडून नेत आहेत. एकत्र कुटुंबाच्या मिळकतीमधील प्रत्येकाचा कायदेशीर असलेला कब्जा प्रत्यक्ष ताब्यात दिल्याखेरीज ठराविक व विशिष्ट भागावर कब्जा करुन हक्क निर्माण करु नये अगर हिश्याचे सरसनिरस वाटप झाल्यशिवाय कोणतेही जमिनीतील ऊसतोड करु नये, असा आदेश प्रतिवादी क्र.१ ते ३ विरुध्द पारित करण्याबाबत विनंती केली आहे.

**प्रतिवादी क्र. १ ते ३ यांचे कथन :–**

०३. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी नि.क्र.५१ वर म्हणणे दाखल केले आहे. संबंधित प्रतिवादींचे कथन आहे की, सदर अर्जातील मजकूर खोटा व लबाडीचा असून मान्य व कबूल नाही. प्रतिवादी यांनी नि.क्र.१७ वर दाव्यास कैफियत व तुर्तातुर्त ताकीद अर्जास म्हणणे दाखल केले असून ते सदर म्हणण्याचा भाग समजण्यात यावा. दावा मिळकतींपैकी गट क्र.५६३, २६६४ व २६७२ या वर्णनाच्या मिळकती प्रतिवादी क्र.१ ते ३ यांच्या मालकी हक्क व वहिवाटीच्या आहेत. सदर मिळकतीमध्ये वादी क्र.१ यांना येणारा हिस्सा

प्रतिवादींनी यापुर्वीच वादी क्र.१ यांना दिला आहे. वादी व प्रतिवादी हे दावा मिळकतीचे सह धारक असल्याने ताकीद अर्ज कायदेशीर नाही. प्रतिवादीच्या नावे कृष्णा सहकारी साखर कारखाना लि. रेठरे चा शेअर्स असून प्रतिवादी पुर्वीपासून तिच्या क्षेत्रातून ऊसाचे उत्पन्न घेत आहे. विनंतीप्रमाणे प्रतिवादी क्र.१ ते ३ यांच्या विरुध्द ताकीद मंजूर झाल्यास त्याचे अपरिमित नुकसान होणार आहे. सबब, अर्ज खर्च रक्कम रु.५०,०००/– बसवून नामंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

**युक्तिवाद व वादप्रश्न :–**

०४. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. उभयपक्षांतर्फे युक्तिवाद ऐकला. प्रस्तुत अर्जातील कथन, प्रतिवादींचे म्हणणे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता पुढील वादप्रश्न विचारार्थ उपस्थित झाले. त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदिवण्यात येत आहेत;

| अ.क्र. | वादप्रश्न | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १) | वादींस प्रथमदर्शनी प्रकरण आहे काय ? | : | होय. |
| २) | सोईचा समतोल वादींचे बाजूने आहे काय ? | : | नाही. |
| ३) | अर्ज नामंजूर झालेस वादींचे पैशाच्या स्वरूपात न भरून येणारे असे अपरिमीत नुकसान होणार आहे काय ? | : | नाही. |
| ४) | आदेश काय ? | : | अर्ज नामंजूर करण्यात येतो ... |

## कारणमिमांसा

**वादप्रश्न क्र.१ करीता :–**

०५. प्रथमदर्शनी प्रकरण म्हणजे प्रामाणीकपणे उपस्थित केलेला वाद की ज्याचा तपास होवून गुणवत्तेवर निर्णय होणे जरूरीचे आहे. यापुर्वी तुर्तातुर्त ताकीद अर्जावर आदेश

पारित केला आहे. तो विचारात घेणेदेखील आवश्यक आहे. त्यावेळी चर्चिलेप्रमाणे, प्रस्तुत प्रकरणी, वादींनी नमुद केलेले नातेसंबंध ही बाब कबूल तथ्य आहे. वादींचे कथन आहे की, दावा मिळकती त्यांच्या वडिलोपार्जीत आहेत. सदर मिळकतींच्या ७/१२ पत्रकांचे अवलोकन करता वादी व प्रतिवादी क्र.१ ते ३ यांच्या नावाच्या नोंदी सामाईक क्षेत्रास असल्याचे स्पष्ट होते. वादी क्र.१ व २ तसेच, प्रतिवादी क्र.१ ते ३ यांच्या दरम्यान दावा मिळकतींसंदर्भात वाटप झाल्याबाबत संयुक्तिक पुरावा अभिलेखावर दाखल नाही. अभिलेखावर नि.दि.दा.क्र.२१२/१९९४ मधील वादपत्राची व खर्चाचे टिपण दाखल असून त्यावरुन त्या दाव्याचा निकाल गुणदोषावर झाला नसल्याचे व तो दावा न्यायालयाने खारीज केल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे, केवळ त्या दाव्यांमधील वादींच्या कथनांच्या आधारे सन १९७० मध्ये दावा मिळकतींचे वाटप झाल्याबाबत अनुमान काढता येत नाही.

०६. वादींचे कथन आहे की, दावा मिळकतींमध्ये त्यांचा प्रत्येकी १/६ हिस्सा आहे. याउलट प्रतिवादींनी सदर कथन नाकारले आहे. त्यामुळे सदर विवादीत बाब पुराव्याअंती निर्णीत होणार आहे. विवादीत कथनांचा विचार करून गुणदोषावर वादग्रस्त प्रश्न निर्णीत होणेस काही कालावधी लागणार आहे. दावा मिळकतींच्या ७/१२ पत्रकी असलेल्या प्रतिवादींच्या नावांच्या नोंदीचा विचार करता, प्रतिवादी क्र.१ ते ३ हे दावा मिळकती हस्तांतरीत करणेचा धोका असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे दावा निकाली निघेपर्यंत दरम्यानचे काळात, दावा मिळकतींचे हस्तांतरणास स्थगिती देणे न्यायाचे व योग्य आहे. त्यामुळे, वादींचा तुर्तातुर्त ताकीद अर्ज नि.क्र.५ अंशतः मंजूर केला आहे. सदर बाब विचारात घेता, मी या मतास आहे की, सकृतदर्शनी दावा मिळकतीं वादींच्या एकत्र कुटुंबाच्या वडिलोपार्जित असल्याचे स्पष्ट होते, त्यामुळे वादींस प्रथमदर्शनी प्रकरण आहे. सबब, वादप्रश्न क्र. १ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवीला आहे.

**<u>वादप्रश्न क्र.२ करीता</u> :–**

०७. सोईचा समतोल म्हणजे उभयपक्षांची तुलनात्मक सोय किंवा गैरसोय होय. तात्पुरता मनाई हुकूम नामंजूर केल्यास वादींस होणाऱ्या गैरसोईची तुलना अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादींस होणाऱ्या गैरसोईशी केली पाहिजे. प्रस्तुत अर्जात वादींनी कथन आहे

की, प्रतिवादी क्र.१ ते ३ हे एकत्र वहिवाटीच्या जमिनीमध्ये ऊसाचे पिक तोडून नेत आहेत. त्या सदंर्भात प्रतिवादींनी कथन केले आहे की, संबंधित प्रतिवादी यांनी त्यांच्या हिश्यात आलेल्या मिळकतीमध्ये ऊस पिकाची लागण केली असून ते पिक कृष्णा सहकारी साखर कारखाना येथे घालवत आहेत. अर्जातील कथन पाहता, वादींनी विवादित ऊस कोणत्या वर्णनाच्या मिळकतीमध्ये आहे, त्याचा गट क्रमांक इत्यादी, नमूद केले नाही. त्यावरुन अर्जातील कथन मोघम स्वरुपाचे असल्याचे स्पष्ट होते. वादीच्या कथनाप्रमाणे दावा मिळकतीचे अद्याप वाटप झाले नाही. अभिलेखाचे अवलोकन करता दावा मिळकतीच्या महसूल पत्रकी वादी व प्रतिवादी यांच्या नावाच्या नोंदी एकत्र असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे, वादी व प्रतिवादी क्र.१ ते ३ हे सहधारक असल्याचे विचारात घेता, न्याय तत्वानुसार सहधारकाविरुध्द तुर्तातुर्त ताकीद आदेश पारित करता येणार नाही. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर केल्यास वादींस गैरसोय होणार नाही. याउलट, अर्ज मंजूर केल्यास प्रकरणांची गुंतागुंत वाढणार आहे. त्यामुळे मी या मतास आहे की, सोईचा समतोल वादींच्या बाजूने नाही. सबब, वादप्रश्न क्र.२ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवीला आहे.

<u>**वादप्रश्न क्र.३ करीता**</u> **:–**

०८. अपरिमीत नुकसान म्हणजे असे की जे पैशाच्या स्वरूपात नुकसान भरपाईने भरून येणार नाही. वादींनी दावा मिळकती एकत्र कुटुंबाच्या वडिलोपार्जित असल्याचे कथन केले आहे. प्रतिवादींनी सदर कथने नाकारली आहेत. वादींचे कथन आहे की, प्रतिवादी क्र.१ ते ३ हे एकत्रीत वहिवाटीत असलेल्या जमिनीतील ऊस पिक तोडून नेत आहेत. त्यामुळे, प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी ऊस पिकाची तोडणी करु नये, असा आदेश पारित करावा. दावा मिळकती स्थावर मालमत्ता शेत जमीन मिळकती आहेत. अर्जातील कथन विचारात घेता, दावा मिळकतींमध्ये ऊसाचे पिक असल्याचे तसेच, त्याची तोडणी सुरु असल्याचे स्पष्ट होते. ऊसाचे पिक हे नगदी पिक असून ऊस तोडणीस प्रतिबंध केल्यास संबंधित कारखान्याकडून ऊस तोडणी करण्याकरिता केलेली व्यवस्था व कार्यवाही यामध्ये बाधा निर्माण होणार आहे. तसेच, तोडणी अभावी ऊस पिकाचे नुकसान होणार आहे. त्यामुळे मी या मतास आहे की, सदर अर्ज नामंजूर केल्यास वादींचे अपरिमीत नुकसान होणार नाही. सबब, वादप्रश्न क्र.३ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवीला आहे.

**वादप्रश्न क्र.४ करीता :–**

०९. प्रस्तुत दावा व तुर्तातुर्त ताकीद अर्ज हे कागदोपत्री पुरावे म्हणजेच दावा मिळकतींच्या महसूल पत्रकांवर आधारीत आहेत. त्यामुळे अभिलेखावर दाखल कागदपत्र, उभयतांमधील नातेसंबंध तसेच वादाचे स्वरूप विचारात घेता, मी या मतास आहे की, दाव्याच्या प्राथमिक स्थितीत कोणाएका पक्षकारावर खर्च बसवणे न्यायाचे व योग्य नाही. सबब, न्यायाच्या दृष्टीने, मी पुढील आदेश करीत आहे;

**आ दे श**

(१) वादींचा तात्पुरता मनाई हुकूम मिळणेबाबतचा अर्ज निशाणी क्र. ४८ नामंजूर करण्यात येतो.

(२) या अर्जाचा खर्च अंतीम निर्णय ज्याच्या पक्षात होईल त्यास देणेत यावा.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषित केला)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by UTPAT ATUL ARUN
Date: 2025.11.24 16:18:19 +0530

(अ.अ. उत्पात)

दिनांक :–२४/११/२०२५. ५ वे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, कराड, जि. सातारा.